




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २७० ●मंगळवार,दि.३० डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# अखेर अजित दादा व शरदचंद्रजी पवार एकत्र

## आता दोन्ही राष्ट्रवादी...

## अजितदादांची थेट घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यात सध्या महानगर पालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. अशातच आता राज्याच्या राजकारणातून सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. पिंपरी- चिंचवडमध्ये महापालिका निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याची घोषणा अजित पवार यांनी केली आहे. आज प्रचाराचा नारळ फोडताना अजित पवारांनी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार असल्याची माहिती दिली आहे.

### ● काय म्हणाले अजित पवार ?

दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीची घोषणा करताना अजित पवार म्हणाले की, ही निवडणूक फार उशिरा आली. कार्यकर्ता जपला पाहिजे, त्याला मान दिला पाहिजे कारण आम्ही शिव- शाहू- फुले आंबेडकरांच्या विचारांनी काम करतो. मी खासदार झालो तेव्हा पी व्ही नरसिंगराव मंत्री होते. शेतकरी कुटुंबातील मी कार्यकर्ता. शरद पवार तेव्हा चांगलं काम करत होते. मला खासदार केल्यावर हा शहरात विकास झाला पाहिजे अस वाटायचं. अनेक ठिकाणाहून लोक इथे नोकरीला यायचे. लोक इथे राहायचे आणि मुक्कामाला पुण्यात जावं लगत होत. आता सुधारणा झाली आहे.

### ● माझी केंद्रात ओळख आहे

पिंपरी चिंचवड महापालिकेबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिकेला ज्यांनी कर्जात ढकललं आहे त्यांना बाजूला करायच आहे. माझी केंद्रात ओळख आहे. प्रश्न सोडवता येईल. आपल्या विचारांचे काही खासदार आहे. त्यांच्याकडून काम करुन घायचं आहे. शेतकरी तुमची माझी जात आहे. दोन दिवस कळ काढा सगळं समजेल. भूलथपांना बळी पडू नका. काही लोकांची दहशत नेस्तनाबूत करायची आहे (महेश लांडगे ना उद्देशून) असंही अजित दादांनी म्हटलं आहे.

### ● संत पीठ हे फक्त नावा पुरते राहिले आहे:अजित पवार

पुढे बोलताना अजित पवार यांनी म्हटले की, कुदळवाडीत जमीनी बळकावण्यात आल्या. संत पिठात वारकरी घडवायचे होते. मात्र तिथे उइडए स्कूल सुरू केली. संत पिठात गीता रामायण शिकवण्यात येत नाही. संत पिठात कंपनी सुरू केली. संत पीठ हे फक्त नावा पुरते राहिले आहे. जे ठरलं होतं ते का थांबवण्यात आलं ? वेगळ्या पद्धतीच राजकारण जे चालल ते थांबवायला हवं. पिंपरी चिंचवड शहरातील माझ्या २५ वर्षाच्या माझ्या राजकारणात मी कधी कर्ज काढलं नव्हतं. आज महापालिकेवर कर्ज झाला आहे. हे पाप कोणाच ? टँकर माफिया शहरात चालत आहे. मुठभर लोकांना पोसण्यासाठी तुम्ही लोकांना पाणी देत नाही असं म्हणत अजित पवार यांनी नाव न घेता महेश लांडगे यांना इशारा दिला आहे.

# 'नवरा वारला पण पक्षाचं काम केलं, आता पैसे नाही म्हणून तिकीट नाकारलं'

## BJP कार्यालयासमोर स्वत:ला संपवणार सरचिटणीस महिलेचा इशारा

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

राज्यभरात महापालिका निवडणुकीचा धुरळा उडाला आहे. तिकीट मिळवण्यासाठी उमेदवारांनी देव अक्षरश: पाण्यात ठेवले आहे. काही ठिकाणी उमेदवारांना तिकीट मिळत आहे तर काही ठिकाणी नाकारलं जात आहे. अशातच कोल्हापूर भाजपमध्ये निष्ठावंत भाजप महिला इच्छुक उमेदवाराने तिकीट न दिल्यामुळे थेट आत्मदहनाचा इशाराच पक्षाला दिला आहे.

भाजपच्या सरचिटणीस धनश्री तोडकर यांनी पक्ष कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा



दिला आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत तिकीट न मिळाल्याने तोडकर यांनी निर्णयच जाहीर केला आहे. धनश्री तोडकर यांनी पक्षाला एक पत्र लिहून मंगळवारी भाजपाच्या पक्ष कार्यालयासमोर आत्मदहन करणार असल्याचं जाहीर करून टाकलं असून आज माझी आर्थिक परिस्थिती नसल्याच्या कारणामुळे पक्षाने तिकीट नाकारल्याचा आरोपही केला आहे.

### ● धनश्री तोडकर यांनी पत्रात काय लिहिलं ?

नमस्कार, मी धनश्री सचिन तोडकर, सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी कोल्हापूर महानगर, मी गेली अनेक वर्षे भारतीय जनता पार्टीचे काम ▶ उर्वरित पान २ वर

# मठाधिपती शिवाजी महाराज, चेअरमन बाबुराव बोत्रे पाटलाच्या हस्ते होणार गेवराई येथील कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

## पुरस्कार वितरणासं माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मनोज जरांगे पाटील विजयसिंह पंडितांची उपस्थिती उपस्थिती

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेदरे स्मृतिप्रीत्यर्थ या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ०१ ते ०५ जानेवारी दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे बीड रोड वरील आठ एकर विस्तारणीय दसरा मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आसल्याची माहिती आयोजन समितीचे मुख्य संयोजक



महेश बेदरे, स्वागताध्यक्ष बप्पासाहेब तळेकर, कार्याध्यक्ष अजय भैय्या दाभाडे , पुरस्कार समिती प्रमुख राजेंद्र आतकरे मुख्य संयोजक महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेश बेद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदर्शनाचे आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना यांचा विशेष सहभाग या प्रदर्शनात असणार आहे. ▶ उर्वरित पान २ वर

# चहा पिण्याच्या बहाण्याने भूमापक कार्यालयाबाहेर आला अन् 'एसीबी'च्या जाळ्यात अडकला




**केज । प्रतिनिधी**

शेतकऱ्याच्या जमिनीची मोजणी झाल्यानंतर क्षेत्र दुरुस्ती करून देण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच मागणाऱ्या भूमापकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. केज तहसील कार्यालयासमोरून जाणाऱ्या महामार्गावरील एका हॉटेलमध्ये १० हजार रुपये लाच स्वीकारताना भूमापक माणिक वाघमारे याला एसीबी पथकाने जेरबंद केले. या प्रकरणाची माहिती अशी की, केज तालुक्यातील बोरगाव येथील एका शेतकऱ्याने दि. १८ डिसेंबर रोजी भूमिअभिलेख कार्यालयामार्फत अधिकृतपणे आपल्या जमिनीची मोजणी करून घेतली होती. मात्र जमिनीच्या जुन्या निजामकालीन अभिलेखांमध्ये क्षेत्र कमी असल्याचे कारण सांगत भूमापक माणिक वाघमारे याने दुरुस्ती करून देण्यासाठी सुरुवातीला ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. नंतर दोघांमध्ये तडजोड होऊन ३० हजार रुपयांवर व्यवहार ठरला.

यातील ५ हजार रुपये तक्रारदार शेतकऱ्याने त्याच दिवशी दिले होते, तर उर्वरित रक्कम नंतर देण्याचे ठरले. मात्र उर्वरित पैसे देण्याची इच्छा नसल्याने शेतकऱ्याने जालना येथील लाचलुचपत ▶ उर्वरित पान २ वर

# जानेवारीपासून रेशन धान्य वाटपात पुन्हा बदल




**मुंबई । प्रतिनिधी**

शिधापत्रिकाधारकांना नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत गव्हाबरोबरच ज्वारीचे वितरण करण्यात आले होते. यात गहू, ज्वारी आणि तांदळाचा पुरवठा केला आहे. त्यामुळे आता गहू ३ किलो आणि तांदूळ २ किलो मिळणार आहे. मागील दोन महिने अंत्योदय योजनेंतर्गत प्रत्येकी पाच किलो गहू व पाच किलो ज्वारी, तसेच २५ ▶ उर्वरित पान २ वर

# संभाजीनगरमध्ये हायव्होल्टेज ड्रामा

## संजय शिरसाट यांना व्हिलन बनवत शिवसेना जिल्हाप्रमुखांची निवडणुकीतून तडकाफडकी माघार

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

शिवसेना-भाजप युतीसाठी पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या बंगल्यावर सुरू असलेल्या बैठकीकडे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी पाठ फिरवली. शिवसेनेचे उमेदवार हमखास निवडून येतील अशा ७ ते ८ जागा या आम्हाला मिळणार नाहीये.

त्यामुळे पक्षातील कार्यकर्त्यांना न्याय देता येणार नाही. अशावेळी मी जिल्हाप्रमुख म्हणून स्वतः निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. माझ्याऐवजी एखाद्या सक्षम कार्यकर्त्याला तिथून संधी देण्याचा माझा प्रयत्न असल्याचे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांनी म्हटले आहे. शिवसेना प्रचार कार्यालयात सोमवारी दुपारपासूनच नाराजीनाट्याला सुरूवात झाली. शिवसेना महिला जिल्हाप्रमुख शारदा



घुले यांना ऐनवेळी उमेदवारी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आणि त्यांनी समर्थकांसह कार्यालयातच ठिय्या दिला. त्यांच्यासोबतच्या महिला पदाधिकाऱ्यांनी घुले यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत इथून हलणार नाही, असे म्हणत घोषणाबाजी सुरू केली. विशेष म्हणजे जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, आमदार प्रदीप जैस्वालही तिथे उपस्थित होते. ▶ उर्वरित पान २ वर

# शहराच्या विकासातून मतदारांचा विश्वासार्थ ठरवाल ही सदिच्छा : बाळासाहेब पिंगळे

## नवनिर्वाचित नगराध्यक्षा व सर्व पक्षीय २२ नगरसेवकांचा सन्मान



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून विकासाची आस लागलेली आहे. मात्र कुठलेही पदाधिकारी नसल्याने प्रशासकीय कारभाराला शहर वैतागून गेले होते. तुम्हा सर्वांच्या रूपाने शहरातील मतदारांनी शहर विकासाचे स्वप्न निवडून दिले आहे. त्यामुळे शहराचा सर्वांगीण विकास करून तुम्ही सर्वजण मतदारांचा विश्वास सार्थ ठरवाल ही सदिच्छा व्यक्त करून सर्वांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख बाळासाहेब पिंगळे सर यांनी केले.

बीड शहरातील नवनिर्वाचीत नगराध्यक्ष आणि विविध पक्षातील २२ स्नेही नगरसेवकांचा शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख बाळासाहेब पिंगळे सरांच्या वतीने हृदय सत्कार सोहळा आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना पिंगळे सर म्हणाले की, सामाजिक क्षेत्रात काम करणारे सर्व स्नेही विविध पक्ष, संघटनेच्या माध्यमातून नगरसेवक म्हणून नगर परिषदेच्या सभागृहात दाखल झाले आहेत. तुम्ही सर्वजण कायम लोकांच्या सुखदुःखात सहभागी आहात म्हणून या सभागृहात जाऊ शकलात. सामाजिक कामात ज्या पद्धतीने एकमेकांच्या हातात हात घालून तुम्ही काम करता त्याच पद्धतीने या सभागृहात ▶ उर्वरित पान २ वर

### ● हा स्नेह आणि प्रेमाचा सत्कार

बीड नगर परिषदमध्ये नव्याने निवडून आलेली ही नवनिर्वाचीत सदस्य मंडळी ही वेगवेगळ्या पक्षातील असली तरी त्यांच्या सोबत आमचे स्नेहाचे आणि प्रेमाचे ऋणानुबंध आहेत. कोण कुठल्या पक्ष, संघटनेतून निवडून आला यापेक्षा तो किती समाजाभिमुख आहे हे महत्वाचे आहे. या ठिकाणी सत्कार होणारी लोकं भलेही विविध पक्षातील असतील मात्र सामाजिक भान आणि जबाबदारी मध्ये त्यांचा कुणीच हात धरू शकत नाही. सर्व नवनिर्वाचिताचा सन्मान हा तुमच्या कर्तृत्वाचा आहे. कर्तृत्वातून तुम्ही मोठे झालात. अनेकाना नव्याने आज पद मिळाले आहे पण त्यांची सामाजिक सेवा ही गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. म्हणूनचं जनतेने तुम्हाला त्यांचा प्रतिनिधी म्हणून सभागृहात पाठवले आहे.







# राष्ट्रीय संकल्प नियोजन दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व

दरवर्षी ३० डिसेंबर रोजी साजरा होणारा 'राष्ट्रीय संकल्प नियोजन दिवस' हा केवळ वैयक्तिक उद्दिष्टे ठरवण्यापुरता मर्यादित नसून, तो समाजाच्या एकूण वाटचालीचा आत्मपरीक्षणाचा आणि पुनर्नियोजनाचा दिवस आहे. वर्षाच्या शेवटी उभे राहून मागील काळाचा आढावा घेणे, आपल्या यश–अपयशांचे प्रामाणिक मूल्यमापन करणे आणि येणाऱ्या काळासाठी ठोस, वास्तववादी व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त संकल्प ठरवणे, ही या दिवसाची खरी प्रेरणा आहे. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, संकल्प नियोजन ही प्रक्रिया व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंध अधिक दृढ करणारी आहे. व्यक्तीचे संकल्प हे वैयक्तिक असले तरी त्यांचे परिणाम कुटुंब, समुदाय, संस्था आणि अखेरीस संपूर्ण समाजावर उमटत असतात.

मानवी जीवन हे केवळ प्रवाहासोबत वाहत जाण्याचे नाव नाही; तर ते जाणीवपूर्वक दिशा देण्याची कला आहे. ही दिशा देण्यासाठी संकल्प आवश्यक असतात. समाजशास्त्र सांगते की, कोणताही समाज प्रगतीच्या दिशेने तेव्हाच वाटचाल करतो, जेव्हा त्या समाजातील बहुसंख्य व्यक्तींच्या ध्येयांमध्ये सुसंगती असते. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा त्या सुसंगतीचा विचार करण्याची संधी देतो. वैयक्तिक संकल्प आणि सामाजिक गरजा यांचा समन्वय साधला गेला, तर संकल्प हे केवळ शब्द न राहता सामाजिक परिवर्तनाची साधने बनतात.

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि ताणतणावपूर्ण जीवनात अनेकदा संकल्प क्षणिक भावनेतून घेतले जातात. वर्षाच्या सुरुवातीला उत्साहाने ठरवलेले संकल्प काही आठवड्यांतच विसरले जातात. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे




दिसून येते की, संकल्प अपयशी ठरण्यामागे केवळ इच्छाशक्तीचा अभाव नसतो, तर सामाजिक–सांस्कृतिक अडथळे, आर्थिक मर्यादा, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि संस्थात्मक दबाव यांचाही मोठा वाटा असतो. त्यामुळे राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा केवळ काय ठरवायचे? एवढाच प्रश्न विचारत नाही, तर कसे ठरवायचे?, कोणत्या परिस्थितीत ठरवायचे? आणि त्या संकल्पांची अंमलबजावणी कशी करायची? याचाही सखोल विचार करायला भाग पाडतो.

संकल्प नियोजन ही मूलतः सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्ती आपल्या अनुभवांमधून, सामाजिक संवादातून आणि सांस्कृतिक मूल्यांमधून संकल्प घडवत असते. उदाहरणार्थ, शिक्षण घेण्याचा संकल्प हा केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी नसून तो कुटुंबाच्या सामाजिक प्रतिष्ठेशी, रोजगाराच्या संधींशी आणि राष्ट्राच्या मानवी भांडवलाशी जोडलेला असतो. त्याचप्रमाणे आरोग्य जपण्याचा संकल्प हा केवळ स्वतःपुरता मर्यादित न राहता, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील ताण कमी करणारा ठरतो. त्यामुळे संकल्प नियोजन करताना 'मी'च्या पलीकडे जाऊन 'आपण'चा विचार करणे ही काळाची गरज आहे.

भारतीय समाजरचनेत संकल्पांची परंपरा प्राचीन काळापासून आढळते. व्रत, प्रतिज्ञा, संकल्पना यांचा उल्लेख धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. मात्र आधुनिक काळात या संकल्पांना वैज्ञानिक नियोजनाची जोड देणे आवश्यक झाले आहे. समाजशास्त्र हे सांगते की, कोणताही संकल्प टिकून राहण्यासाठी तो वास्तववादी असणे, सामाजिक समर्थन मिळणे आणि त्यासाठी आवश्यक संसाधने उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा या तीनही घटकांचा समतोल साधण्याची प्रेरणा देतो.आज भारतासमोर असंख्य सामाजिक आव्हाने उभी आहेत, दारिद्र्य, बेरोजगारी, शिक्षणातील विषमता, लैंगिक असमानता, पर्यावरणीय ऱ्हास, आरोग्य समस्या, सामाजिक तणाव इत्यादी. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय संकल्प नियोजन दिनाचे महत्त्व अधिकच वाढते. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या वैयक्तिक संकल्पांमध्ये सामाजिक जबाबदारीचा समावेश केला, तर सूक्ष्म पातळीवर होणारे बदल व्यापक सामाजिक परिवर्तनाला चालना देऊ शकतात. उदाहरणार्थ, पर्यावरण संवर्धनाचा संकल्प घेणारी व्यक्ती केवळ स्वतःसाठी नाही, तर पुढील पिढ्यांसाठीही शाश्वत भवितव्य घडवण्यास हातभार लावत असते.

संकल्प नियोजन हे केवळ उद्दिष्ट ठरवण्यापुरते मर्यादित नसून, ते आत्मशिस्त, सातत्य आणि सामूहिक सहभाग यांची मागणी करते. समाजशास्त्रीय अभ्यासानुसार, ज्या समाजात सामूहिक संकल्पांची संस्कृती बळकट असते, त्या समाजात सामाजिक ऐक्य आणि सहकार्य अधिक दृढ असते. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा अशा सामूहिक संकल्पांची बीजे रोवण्याचा दिवस ठरू शकतो. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि माध्यमे यांनी या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करून समाजात सकारात्मक चर्चेला चालना दिली, तर संकल्प नियोजन ही केवळ वैयक्तिक कृती न राहता सामाजिक चळवळ बनू शकते. आजच्या डिजिटल युगात संकल्प नियोजनाला नवे परिमाण प्राप्त झाले आहे. सोशल मीडिया, ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि डिजिटल साधनांच्या माध्यमातून लोक आपले संकल्प जाहीर करतात, त्यांची प्रगती शेअर करतात आणि इतरांकडून प्रेरणा घेतात. मात्र समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता, या प्रक्रियेत दिखाऊपणा आणि वास्तव यातील फरक ओळखणे आवश्यक ठरते. संकल्प हे 'दाखवण्यासाठी' नव्हे, तर 'जगण्यासाठी' असावेत, ही जाणीव राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन अधोरेखित करतो. संकल्प अपयशी ठरणे हीही सामाजिक शिकवण असू शकते. अपयशातून शिकणे, आपल्या मर्यादा ओळखणे आणि नव्या पद्धतीने प्रयत्न करणे, ही प्रक्रिया व्यक्तीला अधिक प्रगल्भ बनवते. समाजशास्त्र सांगते की, अपयशाला कलंक न मानता शिकण्याची संधी मानणारा समाज अधिक सर्जनशील आणि प्रगतिशील असतो. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा अशा सकारात्मक दृष्टिकोनाचा प्रसार करण्याची संधी देतो.

शेवटी, राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून, तो वर्षभरासाठीचा मार्गदर्शक ठरायला हवा. संकल्प म्हणजे भविष्यासाठी टाकलेले पाऊल असते आणि ते पाऊल योग्य दिशेने पडावे यासाठी नियोजन, समन्वय आणि सामाजिक भान आवश्यक असते. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले असता, व्यक्तीचे संकल्प जेव्हा सामाजिक हिताशी जोडले जातात, तेव्हाच त्यांचे खरे मूल्य प्रकट होते. म्हणूनच ३० डिसेंबर हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षणाची, पुनर्विचाराची आणि नव्या आशेने पुढे जाण्याची प्रेरणा देणारा ठरतो.

आजच्या बदलत्या काळात, जेव्हा अनिश्चितता आणि अस्थिरता वाढलेली आहे, तेव्हा संकल्प नियोजन हीच स्थैर्याची किल्ली ठरू शकते. राष्ट्रीय संकल्प नियोजन दिन आपल्याला हेच सांगतो की, भविष्य हे आपोआप घडत नाही; ते घडवावे लागते, जाणीवपूर्वक, नियोजनपूर्वक आणि सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून. अशा संकल्पशील समाजातूनच सुदृढ, समतावादी आणि प्रगत राष्ट्राची निर्मिती होऊ शकते.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

◆ पान १ वरून पुढे...

## 'नवरा वारला...

प्रामाणिकपणे करत आहे, काही महिन्यापूर्वी माझे पती कै. सचिन तोडकर यांचे निधन झालं. त्यांच्या निधनानंतर स्वतःला सावरून मी पक्षाचं काम अखंडित ठेवलं. पक्षाचा एकही कार्यक्रम किंवा एकही बैठक चुकवली नाही. कोल्हापूर शहरात इतर कोणत्याही ठिकाणापेक्षा मोठे कार्यक्रम मी एकटी महिला असून घेतलं. पण आज माझी आर्थिक परिस्थिती नाही, या कारणामुळे पक्ष मला तिकीट नाकारत आहे. मी पक्षाच्या विचारधारेशी प्रामाणिक असल्याने पक्षाची विचारधारा सोडू शकत नाही. तिकीट न मिळाल्याने माझ्याकडे दुसरा कुठलाही पर्याय नसल्याने मी उद्या मंगळवार दिनांक ३० डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता पक्ष कार्यालयासमोर आत्मदहन करणार आहे.– आपली, धनश्री सचिन तोडकर सरचिटणीस, भारतीय जनता पार्टी,

## मठाधिपती शिवाजी....

कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहेत. दि १ जानेवारी गुरुवार रोजी दुपारी १:०० वा. महंत शिवाजी महाराज ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री बदामराव पंडित, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून युवा नेते बाळराजे पवार यांची विशेष उपस्थिती असणार , प्रमुख पाहुणे म्हणून गेवराईच्या नगराध्यक्ष गीता भाभी पवार , मुख्याधिकारी विक्रम मांडूरगे, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे,गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे , तालुका कृषी सचिन गिरी, आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर दि २ रोजी विविध तज्ज्ञांची चर्चासत्र होणार आहे दि. ४ जानेवारी रविवार रोजी दुपारी २.३० वाजता कृषिरत्न पुरस्कार वितरण सोहळा व भव्य शेतकरी मेळावा होणार आहे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण साहेब यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब हे असणार आहेत या शेतकरी मेळाव्याला विशेष उपस्थिती गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित, संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे उपस्थित राहणार आहेत तर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख, काँग्रेसचे प्रदेश

◆ पान १ वरून पुढे...

सरचिटणीस आदित्य दादा पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे तर प्रमुख पाहुणे म्हणून हे उपस्थित राहणार आहेत दि. ३ जानेवारी रोजी एकदिवसीय पशुप्रदर्शन ५ जानेवारी रोजी समारोप सोहळा होणार आहे. या तर विविध शेती विषयावर चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार असून वरील सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप होणार आहे. तरी या प्रदर्शनाचा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, स्वागताध्यक्ष बप्पासाहेब तळेकर ,निमंत्रक शिनु भाऊ बेद्रे , कार्याध्यक्ष अजय दाभाडे भाउसाहेब शिंदे ,स्वागत समिती प्रमुख , मान्यवर स्वागत समिती प्रमुख, राजेंद्र बेदरे, नियोजन समिती प्रमुख राजेंद्र मोटे , व्यवस्थापन समिती प्रमुख राजाराम पवार , प्रसिद्धी प्रमुख भागवत जाधव, विनोद पौळ , चर्चासत्र समितीप्रमुख सतीश केसभट, पशुप्रदर्शन समिती प्रमुख संभाजी जाधव आदींनी केले आहे.

## चहा पिण्याच्या बहाण्याने...

प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. एसीबी अधिकाऱ्यांनी तक्रारीची चौकशी करून सत्यता पडताळल्यानंतर सापळा रचला. तक्रारदाराकडे देण्यासाठी अँथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा देण्यात आल्या तसेच व्हॉईस रेकॉर्डर लावून सापळ्याची संपूर्ण माहिती देण्यात आली.

दि. २९ डिसेंबर रोजी दुपारी सुमारे १.३० वाजता तक्रारदार शेतकरी भूमिअभिलेख कार्यालयात गेला आणि भूमापक वाघमारे याला १० हजार रुपये लाच देण्यासाठी आणल्याचे सांगितले. त्यानंतर दोघे तहसील कार्यालयासमोरील केज–माजलगाव रोडवरील पोलिस स्टेशन शेजारी असलेल्या चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी गेले. तेथे वाघमारे याने तक्रारदाराकडून १० हजार रुपये स्वीकारताच दबा धरून बसलेल्या एसीबी पथकाने तात्काळ कारवाई करत त्याला रंगेहात पकडले. सरकारी पंचांसमक्ष झडती घेऊन लाचपोटी घेतलेली रक्कम जप्त करण्यात आली. ही कारवाई जालना विभागाचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक बाळासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शरदचंद्र रोडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वी केली. या प्रकरणी केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

चहाच्या बहाण्याने अडकला जाळ्यात – तक्रारदार शेतकऱ्याने साहेब, बाहेर चहा घेऊ, तिथे पैसे देतो, असे सांगून भूमापक वाघमारे

◆ पान १ वरून पुढे...

याला कार्यालयाबाहेर बोलावले. याच ठिकाणी आधीच दबा धरून बसलेल्या एसीबी अधिकाऱ्यांसमोर वाघमारे याने बिनधास्तपणे लाच स्वीकारली आणि अलगद एसीबीच्या जाळ्यात अडकला. केज तहसील कार्यालयासमोरून जाणाऱ्या महामार्गावरील एका हॉटेलमध्ये १० हजार रुपये लाच स्वीकारताना भूमापक माणिक वाघमारे याला एसीबी पथकाने जेरबंद केले.

## जानेवारीपासून रेशन...

किलो तांदूळ देण्यात आला.

तर प्राधान्य कुटुंबांना यापूर्वी मिळणाऱ्या दोन किलो गहू व तीन किलो तांदळाऐवजी एक किलो गहू व एक किलो ज्वारीचे वितरण केले होते. म्हणजेच, पूर्वीच्या गहूऐवजी गहू व ज्वारीचे संयुक्त वाटप केले होते. नोव्हेंबरपासून लाभार्थ्यांना ज्वारी मिळत होती. जानेवारीपासून धान्य वाटपात पुन्हा बदल केले जाणार आहे. दरम्यान, राज्यातील रेशनधारकांसाठी नववर्षात महत्त्वाचा बदल होणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनांमधील नवीन धान्यप्रमाण पुन्हा लागू करण्यात येणार आहे. जानेवारी २०२६ पासून अंत्योदय योजनेत २१ किलो गहू व १४ किलो तांदूळ, असे एकूण ३५ किलो धान्य मिळणार आहे. प्राधान्य कुटुंब योजनेत प्रत्येकी दरमहा दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू दिला जाणार आहे.

## संभाजीनगरमध्ये...

हा सगळा प्रकार पाहता राजेंद्र जंजाळ यांनी स्वतः निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय जाहीर केला. कार्यकर्त्यांना न्याय मिळणार नसेल तर मग काय उपयोग? ज्या जागा आम्ही निश्चित जिंकू शकतो अशा जागाच आता आम्हाला मिळणार नाहीयेत, त्या सोडण्यात आल्याचे समजते. अशावेळी एखाद्या प्रामाणिक कार्यकर्त्याला संधी द्यावी, यासाठी मी थांबण्याचा निर्णय घेत असल्याचे जंजाळ यांनी सांगितले.

तर निष्ठावंत कार्यकर्ते, ज्यांनी माझ्या विधानसभा निवडणुकीत घरोघरी जाऊन पोलचिट वाटल्या त्यांच्यावर अन्याय होणार असले, त्यांनाच उमेदवारी मिळणार नसेल? तर त्यांना रडू येणारच. अशा पद्धतीने आमच्या जागा भाजप घेऊन अन्याय करणार असेल तर मग युती तोडलेली बरी, असा आक्रमक पावित्रा प्रदीप जैस्वाल यांनीही घेतला.

दरम्यान, पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या बंगल्यावर शिवसेनेचे नेते

◆ पान १ वरून पुढे...

युतीवर अंतीम निर्णय घेण्यासाठी पोहचले. पण नाराज राजेंद्र जंजाळ हे आपल्या संपर्क कार्यालयात जाऊन बसले. तिथे बाहेर त्यांच्या समर्थकांनी शक्तीप्रदर्शन करत जोरदार घोषणाबाजी केली. जागा वाटपात राजेंद्र जंजाळ यांच्या समर्थकांच्याच जागा सोडण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे जंजाळ यांनी या निवडणुक प्रक्रियेपासून स्वतःला दूर ठेवत माघार घेतल्याचे बोलले जाते.

## शहराच्या विकासातून...

समाजाभिमुख कार्यासाठी हातात हात घालून काम करावे ही सामान्य माणसांची इच्छा आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकीय कारभाराला जनता वैतागलेली आहे. त्यामुळे तुम्ही आता शहराच्या सर्वांगीण विकासासाठी जोमाने कामाला लागत शहर एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाल हा विश्वास आहे. असे प्रतिपादन श्री.पिंगळे यांनी केले. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, शेख मुजीब भाई नूतन नगरसेवक उल्हास गिराम, विनोद मुळूक, जगदीश गुरुखुदे, किशोर पिंगळे, रणजीत बनसोडे, संजय उडाण,राहुल गुरुखुदे , राणा चव्हाण, सागर देशपांडे, अयुब खान, सुरज चुंगडे, प्रमोद शिंदे, नागेश तांबारे, शेख बिलाल, शितलताई चक्रे, महेश धांडे, मनोज गोडसे, शुभम धूत, नितीन साखरे, मंगेश धोंडगे, नंदकुमार पिंगळे, मोहसीन मेंबर.यांचा सत्कार करण्यात आला.

आपण आता जोमाने कामाला लागून आपले बीड शहर एका वेगळ्या उंचीवर घेऊन जाल हा विश्वास व्यक्त करून आपणा सर्वांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देतो. यावेळी सुरेश शेटे, झुंजार धांडे, मुकुंद भालेकर, हनुमान पिंगळे, जुगलसेठ जैन, प्रफुल पोरवाल, बबन सुस्कर, राजेश आरसूळ, रणजीत पिंगळे, प्रल्हाद पिंगळे, अभय कुलकर्णी, अतुल मुळे, संजय सांगळे, सुशील पिंगळे, विक्रम कपूर, ओम प्रकाश कश्यप, मधुकर धांडे, स्वप्निल पिंगळे,अंकुश आगळे, संग्राम कपूर, उदय कुमार जैन, जालिंदर पन्हाळकर, बालाजी पवार ,शेख बब्बर भाई, मुंदडा सर, भास्कर जोगदंड, ईश्वर टेकवाणी, गणेश जगताप, पोपट पिंगळे, सचिन डहाळे, बाबा पिंगळे, विनोद जैन,संग्राम कपूर ,रमेश गंगाधरे ,अमोल कुमकर, नवनाथ पवार, गणेश पिंगळे, गोविंद पिंगळे, देविदास पिंगळे, प्रफुल जैन, शिलचंद्र पोरवाल, तेजमल नहार, विनोद पिंगळे, हरीश कुकडेजा, सुनील कुकडेजा, मोती सिंग राजपूत, वसीम भाई, दिनेश गुरखुदे, शुभम गुरखुदे, विलास अडसूळ, संतोष वेदपाठक भास्कर पिंगळे, शुभम पिंगळे, बबन पिंगळे,आधी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

◆ पान ४ वरून पुढे...

## आ. नमिता मुंदडा...

तर शेतकऱ्यांना नाईलाजाने कमी दरात आपला माल विकावा लागेल आणि त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होईल. शेतकऱ्यांच्या हितासाठी ही मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली होती. आ. नमिता मुंदडा यांच्या या मागणीची तातडीने दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने २९ डिसेंबर २०२५ रोजी अधिकृत परिपत्रक काढून मुदतवाढीची घोषणा केली. या निर्णयानुसार, आता सोयाबीन, मूग आणि उडीद या पिकांच्या हमीभावाने खरेदीसाठी शेतकऱ्यांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, त्यांना आता त्यांच्या शेतमालाला योग्य हमीभाव मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## प्रत्येक जिनिंगवर...

पूर्णवेळ सुरू का नाही? सीसीआय प्रशासनाने तात्काळ बीड येथील जिनिंग पूर्णवेळ सुरू कराव्यात, जेणेकरून शेतकऱ्यांची होणारी हेळसांड थांबेल, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. ही मागणी राजेंद्र आमटे, गणेश ढवळे,अशोकरावजी येडे, अर्जुन सोनवणे, राहुल साळुंखे, खाजाभाई पठाण, दिलीप शिंदे, विक्रम शिंदे, रमेश गुंड, नानासाहेब कडबाने, मोहन गव्हाणे, संपत गव्हाणे, राजू गायके, सुहास जायभाय, गणेश नाईकवाडे, राजू वीर, किरण सोळुंके, राजू सोळुंके, श्रीराम खुरणे, गोविंद तीपाले, महेंद्र तीपाले, गोरख टेकाळे आदी शेतकरी बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे.

## बीडचे विद्रुपीकरण...

नितीन वाघमारे , रुक्मिणी नागापुरे सामाजिक कार्यकर्ते सहभागी

◆ पान ४ वरून पुढे...

झाले होते. न्यायालयाच्या आदेशाची अवमानना– राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांना शहर बॅनरमुक्त ठेवण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले असून त्यानुसार दरवर्षी पालिकांकडून शपथपत्र दाखल करण्यात येते. मात्र प्रत्यक्षात बीडमध्ये बॅनरमुक्ती केवळ कागदोपत्रीच असून हे थेट न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन आहे. ही बाब गंभीर असून याला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जबाबदार असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. नाशिक पॅटर्न' बीडमध्ये राबवा – डॉ. ढवळे– नाशिक शहरात अनधिकृत बॅनर व होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर थेट बॅनरवर झळकलेल्या व्यक्तींविरोधात एफआयआर दाखल करत २१ पेक्षा अधिक गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. राज्यभर चर्चेचा विषय ठरलेला आणि कौतुकास्पद असा 'होर्डिंग्जमुक्तीचा नाशिक पॅटर्न' बीडमध्येही तातडीने राबवावा, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी केली. नवनिर्वाचितांकडूनच नियमांना हरताळ– बीड नगरपरिषद निवडणुकीत जनतेने मोठ्या अपेक्षेने निवडून दिलेल्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी पदभार स्वीकारण्यापूर्वीच कायदे व नियम पायदळी तुडवल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. सर्वपक्षीय विजयी उमेदवारांनी सत्तेची धुंदी चढताच शहरभर अनधिकृत बॅनरबाजीचा कहर केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## रहेमान सय्यद...

मा.आ. भिमराव धोंडे यांच्या आई–वडिलांच्या स्मरणार्थ दिला जाणारा हा पुरस्कार ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता भगवान विद्यालय आष्टी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान होणार आहे. निस्वार्थ समाजसेवा तसेच धडाडीचे पत्रकारितेतील योगदान आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन हा गौरव जाहीर करण्यात आला. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल रहेमान सय्यद यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## कृषीथॉन २०२५...

एक वेगळी ओळख निर्माण करत आहे. हनी दर्डा या केवळ एक यशस्वी उद्योगपती नाहीत, तर शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी समर्पित असलेली एक दूरदर्शी नेत्या आहेत. एक्झोम ही कंपनी जागतिक पातळीवर अत्याधुनिक बायोटेक्नॉलॉजीवर आधारित, रेसिड्यू–फ्री, जैविक आणि सेंद्रिय, शेती उत्पादनं शेतकऱ्यांपर्यंत पोहोच आहेत. आपल्या मनोगतात दर्डा म्हणाल्या जगेल माती तर टिकेल शेती. माती चांगली राहिली तर शाश्वत शेती होईल आणि शेवटी त्या म्हणाल्या हा पुरस्कार माझा वयक्तिक नसून याच श्रेय संपूर्ण एक्झोम टीमला जाते.

## मोरगावला बांधावर...

दिसली पाहिजे हा संदेश मोरगावच्या कारवाईत प्रत्यक्षात उतरल्याचे चित्र दिसले . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी वेळोवेळी घेतलेल्या आढाव्याचा ठसा या संपूर्ण प्रक्रियेत जाणवत होता. या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . मात्र त्यांनी फक्त सभागृहात बसून तक्रारी ऐकून घेणे इतक्यावर न थांबता , नागरिकांनी मांडलेल्या अतिक्रमणाच्या तक्रारी आणि शेतातील रस्त्याच्या समस्यांबाबत थेट जागेवर जाऊन पाहणी केली . गोविंद जाधव आणि सुंदर भड यांनी रस्त्याची समस्या मांडताच तहसीलदार शेळके यांनी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसह शेतातील रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली . रस्ता खुला करून दिला जाईल आणि अडथळे दूर करण्यात येतील , अशी ठाम हमी त्यांनी गावकऱ्यांना दिली. पाणी , शेती , महसूल दाखले , ओळखपत्रे , शासकीय योजना , पीकविमा , ॲग्रीस्टॅक , जमीन विषयक प्रश्न यावर तहसीलदारांनी समजेल अशा भाषेत मार्गदर्शन केले . कुठे तात्काळ उपाय सुचवले , तर कुठे प्रक्रिया स्पष्ट करून पुढील कार्यवाहीची

◆ पान ४ वरून पुढे...

दिशा दाखवली . या संवादातून अनेक नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि दिलास्याची भावना दिसून आली. या आढावा बैठकीत ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण ओव्हाळ यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रास्ताविकातून दिली . यावेळी मंडळ अधिकारी श्रीमती सोनाली कदम , माणिक पांढरे , रेश्मा तानगे , आशा घाडगे , अविनाश माळवे , अनिल गायकवाड , ग्रामपंचायत अधिकारी कडू पाटील , सरपंच लता जाधव , उपसरपंच मोरगाव तसेच महसूल सेवक बिरलिंगे , काकडे उपस्थित होते . पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अडचणी थेट मांडल्या. या निमित्ताने विविध प्रमाणपत्रे , दाखले , ऊसतोड कामगार ओळखपत्र , धरणग्रस्त प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र , कुणबी दाखले , डोमेसाइल प्रमाणपत्र , फार्मर आयडी यांचे थेट वाटप करण्यात आले . लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान हा या उपक्रमाचा खरा यशस्वी निष्कर्ष ठरला. बैठकीनंतर एका ज्येष्ठ ग्रामस्थाने भावूक होत सांगितले , आयुष्यात पहिल्यांदाच तहसीलदार आमच्या गावात येऊन आमच्याशी बसले आणि बांधावर जाऊन प्रश्न पाहिले . आज वाटतं सरकार खरंच जवळ आलं आहे. एका शेतकऱ्याने म्हटले , आधी कार्यालयात फेऱ्या माराव्या लागायच्या . आज मात्र प्रश्न सांगितला आणि लगेच जागेवर पाहणी झाली. या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्पष्ट केले की , शासनाचे आदेश , वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि स्थानिक पातळीवरील प्रामाणिक अंमलबजावणी या तिन्हींची सांगड घातली तरच सुसाशन प्रत्यक्षात उतरते . प्रशासन म्हणजे फक्त फाईल्स नव्हेत , तर लोकांच्या आयुष्याशी जोडलेली जबाबदारी आहे , असे त्यांनी ठामपणे सांगितले . बैठकीच्या शेवटी ग्रामस्थांनी तहसीलदार शेळके तसेच संपूर्ण महसूल यंत्रणेचे आभार मानले . मोरगाव येथे झालेली ही पाहणी आणि बैठक प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करणारी ठरली असून , प्रशासन जर थेट गावात उतरले , तर समस्यांवर उपायही तिथेच सापडतात , हा विश्वास गावकऱ्यांमध्ये दृढ झाला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## नवीन वर्षाची सुरुवात हरिनामाने ३१ डिसेंबर ते १० जानेवारीयशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे भव्य कीर्तन महोत्सव

बीड । प्रतिनिधी

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वोत्तम संस्कृती असून तिचे जतन व संवर्धन व्हावे, तसेच पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण टाळावे या उद्देशाने गेल्या २५ वर्षांपासून बीड शहरात हॅपी न्यू इयर भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून साजरा केला जात आहे. याच परंपरेनुसार यावर्षीही ३१ डिसेंबर ते १० जानेवारी या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या अकरा दिवसीय महोत्सवात सकाळी ११ ते ४ या वेळेत पाच दिवस तीर्थ महात्म्य कथा संपन्न होणार असून, महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेरील पवित्र तीर्थक्षेत्रांचे महात्म्य या कथांमधून उलगडले जाणार आहे. या कथा साध्वी ह.भ.प. वैभवी श्रीजी (वृंदावन धाम) सादर करणार आहेत. तसेच सायंकाळी ४ ते रात्री ९ या वेळेत पाच दिवस चाणक्य नीति कथा होणार असून, दैनंदिन व सांसारिक जीवनात मार्गदर्शक ठरणाऱ्या या कथांचे निरूपण ह.भ.प. प्रसाद महाराज काष्टे (सेलू, परभणी करणार आहेत.

# महाराष्ट्रातुन Mpsc मध्ये चौथी Rank प्राप्त शैलेश भिकाजी आंधळे यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

आपल्या संस्थेमध्ये एमपीएससी परीक्षेतून महाराष्ट्रातून चौथी ठरपज्ञ प्राप्त केलेले शैलेश भिकाजी आंधळे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे प्रमुख वशिष्ठ बडे, व्यवस्थापक तुकाराम



भापकर सर, धनराज दराडे, दत्तात्रय खंदारे सर, महेंद्र पांचाळ सर, एडवोकेट प्रदीप तिडके, यांची यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंदारे सरांनी आतिशय उत्तम पणे केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना शैलेश आंधळे यांनी विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये कशा पद्धतीने यशस्वी झालं पाहिजे याची सविस्तर माहिती दिली.

– शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थी जास्त यशस्वी होतात हे त्यांनी सांगितलं.

– त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेमध्ये कसे यश मिळवावे.

– विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून टीव्हीपासून त्याचबरोबर इंस्टाग्राम रिल पासून दूर राहावे हे त्यांनी सांगितले..

– विध्यार्थींनी आपल्या तब्येती कडे लक्ष दिले पाहिजे.

## समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी नगरपरिषद च्या स्वीकृत सदस्यपदी सय्यद एजाज यांना संधी द्या

### शहरातील मुस्लिम समाजाची जोरदार मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगर परिषद निवडणूक नुकतीच पार पडली असून, जनतेने पुन्हा एकदा पवार कुटुंबाच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भारतीय जनता पक्षाच्या बाजूने स्पष्ट कौल दिला आहे. महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपने गेवराई नगरपालिकेवर झेंडा फडकवत एकहाती सत्ता स्थापन केली आहे.



लोकनेते बाळराजे पवार, माजी आमदार लक्ष्मण पवार तसेच माजी मंत्री बदामराव पंडित यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वावर विश्वास ठेवून शहरातील मतदारांनी मतदानाद्वारे भरभरून आशीर्वाद दिल्याने सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांचा नगराध्यक्षपदी विजय झाला आहे. एकूण २० जागांपैकी भाजपचे १६ उमेदवार विजयी झाले असून, २०२५ च्या नगर परिषद निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले आहे.मात्र, प्रभाग क्रमांक १० मधून भाजपचे धडाडीचे व लोकप्रिय उमेदवार सय्यद एजाज यांचा केवळ १९ मतांनी पराभव झाला. अत्यंत कमी फरकाने पराभूत झालेल्या सय्यद एजाज यांनी प्रचारकाळात नागरिकांच्या विविध समस्या मांडत प्रभावी जनसंपर्क साधला होता. सय्यद एजाज हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून, गोर-गरिबांच्या अडचणी सोडवण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आणि समाजहितासाठी कार्य करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.त्यामुळे लोकनेते बाळराजे पवार व माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी सय्यद एजाज यांची गेवराई नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती करावी, अशी जोरदार मागणी शहरातील मुस्लिम समाजासह विविध सामाजिक घटकांकडून करण्यात येत आहे. स्वीकृत सदस्यपदी संधी दिल्यास वार्डाच्या व शहरातील नागरिकांच्या समस्या सोडतील असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

## आष्टी ते मुगगाव रस्त्यावरील खड्ड्यांना निकृष्ट ठिगळांचा आधार, बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

आष्टी । प्रतिनिधी

गेल्या अनेक महिन्यांपासून खड्ड्यांच्या विळख्यात सापडलेल्या आष्टी-ब्रह्मगाव-मुगगाव या महत्त्वाच्या रस्त्यावर अखेर खड्डे भरण्याचे काम सुरु झाले आहे. मात्र, हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आणि थातूरमातूर पद्धतीने केले जात असल्याने प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे संबंधित यंत्रणा काम थातूरमातूर पद्धतीने सुरू आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, या रस्त्यावर गेल्या पावसाळ्यात मोठमोठे खड्डे पडले होते. हजारो प्रवाशांची वर्दळ असलेल्या या मार्गाची दयनीय अवस्था झाली आहे. सध्या सुरू असलेल्या कामात डांबराचा वापर अत्यंत



कमी प्रमाणात केला जात असून, खड्ड्यात टाकलेली खडी काही तासांतच बाहेर येत आहे. 'पुढे काम सुरू असताना मागे खडी उखडत आहे', अशी विदारक स्थिती सध्या पाहायला मिळत आहे. रस्त्यावर विखुरलेल्या मोकळ्या खडीमुळे दुचाकीस्वारांचा ताबा सुटुन अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या निकृष्ट कामामुळे खड्डे तर बुजले जात नाहीतच, उलट रस्त्यावर पसरलेल्या खडीमुळे हा प्रवास अधिक जीवघेणा ठरत आहे.

या गंभीर प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. कामाच्या ठिकाणी संबंधित विभागाचा कोणताही अधिकारी देखरेखीसाठी नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे, ज्या गावांतून हा रस्ता जातो, त्या गावातील लोकप्रतिनिधींनीही या निकृष्ट कामाबाबत मौन बाळगल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. हा रस्ता अतिशय महत्त्वाचा असून यावरून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. निकृष्ट पद्धतीने काम उरकण्यापेक्षा दर्जेदार काम करून हा रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा, अशी मागणी होत आहे.

## उद्योजक बाळासाहेब भुकन यांना राज्यस्तरीय गंगाई-बाबाजी आदर्श उद्योजक जाहिर



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील भगवान महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या गंगाई बाबाजी महोत्सवाच्या निमित्ताने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये टाकळी (अमिया) येथील मूळ रहिवासी व आष्टी-पुणे येथे कार्यरत असलेले उद्योजक बाळासाहेब भुकन यांची राज्यस्तरीय 'आदर्श उद्योजक' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे तसेच संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी ही घोषणा केली. बांधकाम व्यवसायात दर्जेदार काम, वेळेचे काटेकोर नियोजन व विश्वासार्हता याच्या जोरावर बाळासाहेब भुकन यांनी या क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची व उद्योजकीय यशाची दखल घेऊनच हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांनी बाळासाहेब भुकन यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जिभेद्वारा उच्चारला जाणारा शब्द वरदानासह शापाचे ही कार्य करतो : साध्वी सुविधी म.सा.

बीड । प्रतिनिधी

बीड येथे चालू असलेल्या जैन धर्म आराधना प्रवचना मालेत तिसरे पुष्प गुंफताना पूज्य श्री सुविधाजी म. साहेबांनी आज उच्चारणार्या वाणीचे महत्त्व विषद केले. वाणी ही केवळ पंचेंद्रियासह मानवालाच मिळते. व ही वाणीच माणसाची ओळख पटवते. म्हणून वाणी कशी असावी हे सांगताना त्यांनी सांगितले. जिभेद्वारा उच्चारला जाणारा शब्द शापासह वरदानाचेही काम पार पाडतो. उच्चारला जाणार शब्द हा शब्दच असतो, मात्र त्याच्या उच्चारणात अंतर पडतो. एका शब्दाने घाव होतो तर दुसर्या प्रकारातून तो घाव मिटवण्या मलमाचे कार्य करतो. अशी क्षमता ही तुमच्या उच्चारणार्या वाणीत आहे. आपला जीव हा पंच इन्द्रियधारी आहे. यामध्ये ही जीव्हा रसनेंद्रियासह वाणी उच्चारणे या दुहेरी कार्याला उपयुक्त आहे. जी क्षमता केवळ या मानवालाच लाभलेली आहे. द्वेष, राग, तिरस्कार, व्यक्त करणार्या शस्त्राचे तर दुभंगलेल्या मनाला दुखावलेल्या हृदयाला सांत्वना देण्याचे कार्यही याच जिभेला मिळालेले आहे, म्हणून शब्द उच्चारण्याची क्षमता हिच्यात जी आहे. याचाच परिणाम पाहता या वाणीमुळे कर्माचे बंधन होऊन ते पाप वृत्तीला कारणीभूत ठरते. व यातूनच कर्म निर्मूलनही करून पुण्य वृद्धी होते. याच शब्दातून मानवाला हीन-दीन, उच्च- निच्च संबोधले जाते. या जिभेची वैशिष्ट्यता ही अशी दिसून येते. इतर इंद्रिये दोन असून कार्य एकच करतात मात्र ही जीवा एकटी असून कार्य दोन प्रकारात करते. रस स्वादाने पचवणे तर शब्द उच्चारणाने ओळख करणे ही याची महत्त्वाची दोन वैशिष्ट्ये ठरतात .म्हणून तर तिच्या संरक्षणाला ३२ दाताची तटबंदी असून हेच इंद्रिय अशी असून तिला एकटीलाच कुठेही देहाच्या याच इंद्रियाला स्थानांतर अथवा बदलण्याची व्यवस्था नाही एवढी ही महत्त्वाची आहे. तिचे कार्य भिंतीप्रमाणे एकाच घरात माणसे जोडण्याचे. तर नदीवरील पुलाप्रमाणे सर्वांना जोडण्याचे आहे. एक अहंकाराने जगली जाते तर दुसरी माणुसकीतून सहिष्णूतेतून तारली जाते. एका वाणीतून महाभारत रामायण घडले जाते तर दुसर्या वाणीतून नैतिकतेच्या धड्यातून धर्माला जागवली जाते. अशा वाणीचा वापर करताना पाणी ज्याप्रमाणे शुद्ध करताना गाळले जाते तसेच वाणी उच्चारतानाही तिला ही चार पडद्यातून गाळून घ्यावे लागते.

## सौ. के.एस.के. महाविद्यालयात ऑनलाईन राष्ट्रीय रसायनशास्त्र प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न

बीड । प्रतिनिधी

येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात नवगण शिक्षण संस्था राजुरी (न) च्या सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त रसायणशास्त्र विभागाच्या वतीने ऑनलाईन राष्ट्रीय रसायणशास्त्र प्रेझेंटेशन स्पर्धचे आयोजन दि. २९ डिसेंबर २०२५ सकाळी ११ ते ०२ यावेळेत करण्यात आले. सदरील स्पर्धेसाठी देशभरातील महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, पश्चिम बंगाल, हरियाना इत्यादी राज्यातील एकूण ३८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सहभागी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने आपले प्रेझेंटेशन दिले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून डॉ. विकास रागोळे, कै. रमेशराव वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि. परभणी आणि डॉ. उध्दव चौधर, कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर का. हे लाभले होते. सदरील स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय येणार्या विद्यार्थ्यांना रोख पारीतोषीक आणि प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे. सदरील स्पर्धेसाठी नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे , डॉ. विश्वंभर देशमाने , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर संचालक डॉ. ए.एस. खान , कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदरील स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाकरता रसायणशास्त्र विभाग प्रमुख तथा आयक्युएसी समन्वयक डॉ. सोनाजी गायकवाड, डॉ. अशोक नागरगोजे, प्रा. दिपक पवार, प्रा. किर्ती पांडूळे आणि प्रा. विकास पवार यांनी विशेष परीश्रम घेतले.

## वजने मापे विभागाकडून व्यापाऱ्यांना महत्त्वाचे आव्हान महत्त्वाच्या नियम बदलाकडे व्यापाऱ्यांचे लक्ष वेधले

बीड । प्रतिनिधी

व्यापारी बंधुंसाठी महत्वाचेया मथळयाखाली एक Press Note / Whatsapp Message वाचण्यात येत असुन त्यामधे मोजमाप उपकरणांची पडताळणी आता २४ महिन्यांसाठी एकसमान असल्याचा मजकुर प्रदर्शित करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या ग्राहक संरक्षण, अन्न व वितरण मंत्रालयाच्या दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजीच्या अधिसुचनेनुसार वैध मापनशास्त्र (सामान्य) नियम, २०११ मधील नियम २७(२) (क) मधे खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे . १८ डिसेंबर २०२५ पुर्वी चा नियम २७(२)(क): सर्व, वजने, क्षमता मोजमापे, लांबी मोजमापे, टेप, बीम स्केल, काउंटर मशीन साठी चोवीस महिने. १८ डिसेंबर २०२५ नंतरचा नियम २७(२)(क): सर्व, वजने, क्षमता मोजमापे, लांबी मोजमापे, टेप, बीम स्केल, काउंटर मशीन आणी इंधन डिस्पेंसर (पेट्रोल आणी डिझेल) साठी चोवीस महिने. वरील अधिसुचनेनुसार २४ महिने वैधता असणारे मेकॅनिकल स्वरुपाचे वरील वजनेमापे १) वजने, २) धारिता मापे, ३) लांबी मोजमापे (मीटरपटटी), ४) टेप (लांबी मोजण्याचे टेप), ५) बीम स्केल (दांडीचा तराजु), ६) काउंटर मशिन यांच्यामधे फक्त इंधन डिस्पेंसर (पेट्रोल आणी डिझेल) यांचा समावेश केलेला आहे. वरील अधिसुचनेबाबत आलेल्या Press Note / Whatsapp Message नुसार इलेक्ट्रॉनिक काटे यांच्या पडताळणीची मुदत एकसमान म्हणजेच २४ महिने झाली असल्याचा समज काही व्यापारी बंधुंमधे झालेला आहे. या स्पष्टीकरणादवारे सर्व व्यापारी बंधुंना कळविण्यात येते की इलेक्ट्रॉनिक काटे यांच्या पडताळणीची मुदत ही १२ महिने म्हणजे १ वर्ष इतकीच आहे.

## तुळशीराम अतकरे आणिशिवाजी गायकवाड यांची संगीत सभा रंगली

बीड । प्रतिनिधी

नादस्वर चैतन्य म्युझिक अकॅडमीच्या वतीने आयोजित ११ व्या मासिक सभेत तुळशीराम अतकरे यांचे गायन आणि शिवाजीराव गायकवाड यांच्या सोलो तबला वादनाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. या वेळी रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. येथील सहयोगनगर भागातील नरहरी दळे आणि सचिन मार्गे यांच्या नादस्वर चैतन्य म्युझिक अकॅडमीच्या वतीने तुळशीराम अतकरे यांच्या गायनाची मासिक संगीत सभा आयोजित करण्यात आली. विशुद्ध हिंदुस्थानी संगीत ऐकवत अतकरे यांनी श्रवणाचा छान आनंद दिला.त्यांना मूळचे धोंडराई (ता. गेवराई )चे पण संगीत शिक्षक म्हणून उत्तराखंड मधील मसुरी येथे वास्तव्यास असणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिवाजीराव गायकवाड यांनी तबला संगत केली

## मुलींच्या कबड्डी स्पर्धेत जयभवानीचा संघ विजेता

### माध्यमिक विद्यालय घोगस पारगावचा संघ ठरला उपविजेता

गेवराई । प्रतिनिधी

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असलेल्या शारदा क्रिडा महोत्सवात मुलींच्या गटात झालेल्या कबड्डी स्पर्धेत गढी येथील जयभवानी विद्यालयाच्या संघाने विजेतेपद पटकावले. उपविजेतेपद माध्यमिक विद्यालय विद्यालय घोगस पारगावच्या संघाने पटकावले तर शिवाजी विद्यालय मालेगावचा संघ तिसऱ्या स्थानावर राहिला. यावेळी शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, समाधान मस्के यांच्यासह मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सुरु असलेल्या शारदा क्रिडा महोत्सवात मुलींच्या गटात कबड्डी स्पर्धा गेवराई येथील शारदा विद्या मंदिराच्या मैदानावर झाल्या. दिवसभर झालेल्या साखळी सामन्या नंतर अंतिम सामन्यात गढी येथील जयभवानी विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत विजेते पद पटकावले. संघाची कप्तान ज्ञानेश्वरी शिंदे हिच्या नेतृत्वाखाली गोकुळ श्रुती, राठोड निशा, पवार संध्या, बोर्ड शिवानी, जाधव प्राची, चव्हाण निकिता, केकान सुप्रिया, कांडेकर गौरी, धोत्रे सिद्धी, कादे सखू, वायभट गीता या खेळाडूंनी अतिशय चांगली कामगिरी केली. संघाला मुख्याध्यापक व्हि. पी. राठोड, क्रिडा शिक्षक गणपत डोंगरे, दिलीप धस , विजयकुमार अपशिंगेकर, आकाश आडे, नितीन पांढरे, दादा तळेकर, भगवान शिंदे, रमेश देशमुख चंद्रकांत पवार, ओम मोटे, सुमेर सय्यद, श्रीमती सुरेखा सुदेवाड यांचे मार्गदर्शन लाभले. कबड्डी स्पर्धेचे उपविजेतेपद माध्यमिक विद्यालय घोगस पारगावच्या संघाने मिळवले. संघातील ज्योती गर्कळ, तनुजा गर्कळ, पुजा वारे, धनश्री गर्कळ,रुपाली गर्कळ,भक्ती गर्कळ, आरती डोंगरे, सुमित्रा गर्जे, ज्ञानेश्वरी दराडे या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. संघाला मुख्याध्यापक रणजित सानप यांच्यासह आत्माराम शिंगाडे, विजय कर्नेवाड, धर्मराज खेडकर, सोमेश्वर पाटेकर, बंडू जरांगे, कृष्णा खेडकर यांचे मार्गदर्शन लाभले. शिवाजी विद्यालय मालेगावच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवला. विजेत्यांना लवकरच एका कार्यक्रमात पारितोषिके देण्यात येतील असे आयोजक रणवीर पंडित यांनी यावेळी सांगितले. कबड्डी स्पर्धेचे पंच म्हणून डॉ .केतन गायकवाड, शुभम कादे, बाळू आडे, गणेश यादव, आकाश राठोड, ज्ञानेश्वर धापसे, सिद्धू माने, हर्षद गावंडे, हर्षद माने, रोहन लोणे, सुदीप डाके यांनी काम पहिले. यावेळी संस्थेतील सर्व शाळेचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, क्रीडाप्रेमी नागरिक, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संखेने उपस्थित होते.


## जाहिर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९५१/२०२५**

**छाया धुरंधरे वि. अशोक**

ज्यापेक्षा सरस्वतीबाई पि. रोमाजी धुरंधरे, हे दिनांक २३/०८/२००५ रोजी बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच **अर्जदार- १. छाया भ्र. ईश्वर धुरंधरे, वय. ३६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. बीड, ता.जि.बीड ह.मु. यशराज नगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड, २. साक्षी पि. ईश्वर धुरंधरे, वय. १.६ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ३. सोनम पि. ईश्वर धुरंधरे, वय १४ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, अ.पा. क. आई अर्जदार क्र. १**

अर्जदार क्र. १ ही मयताची सुन असुन, अर्जदार क. २ व ३ हया मयताच्या नाती आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे **सरस्वतीबाई पि. रोमाजी धुरंधरे,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २२/०१/२०२६ ही आहे.**

आज दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(ॲड. के. व्ही. दाभाडे यांचे मार्फत)**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. ३० डिसेंबर २०२५ ● पान ४



# बीड जिल्हा पोलीस दलाची २०२५ मध्ये प्रभावी कामगिरी

■ आर्थिक गुन्हे, सायबर फसवणूक, गंभीर गुन्ह्यांचा उलगडा व नागरिकाभिमुख उपक्रमांना गती ■

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२५ मध्ये बीड जिल्हा पोलीस दलाने आर्थिक गुन्हे, सायबर गुन्हे, मालमत्ताविषयक गुन्हे, महिला व बाल संरक्षण, तसेच तांत्रिक सुधारणा या सर्व आघाड्यांवर प्रभावी आणि परिणामकारक कामगिरी करत गुन्हेगारीवर ठोस नियंत्रण मिळवले आहे.भविष्यातसीसीटीव्ही विस्तार, तांत्रिक विश्लेषण व प्रेडिक्टिव पोलिसिंगद्वारे गुन्हेगारीविरोधातील कारवाई अधिक तीव्र केली जाणार असल्याचे बीड जिल्हा पोलीस दलाने स्पष्ट केले आहे.

### ● आर्थिक गुन्हे शाखेची ठोस कारवाई

बीड येथील आर्थिक गुन्हे शाखेकडे २०२५ मध्ये एकूण ४२ गुन्ह्यांचा तपास सुरू होता. यापैकी १८ गुन्ह्यांची निर्गती करण्यात आली असून २४ गुन्हे तपासाधीन आहेत. एकूण ३५७ आरोपींपैकी २६७ आरोपी अटक किंवा अटकपूर्व कारवाईत असून ९० आरोपी फरार आहेत. आर्थिक अपहार प्रकरणांत ६ वित्तीय संस्थांचे एमपीआयडी प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले असून ३ प्रस्ताव प्रक्रियेत आहेत. संबंधित मालमत्तेचे एकूण मूल्य १३७.५६ कोटी रुपये इतके आहे.

### ● सायबर गुन्ह्यांवर कडक नियंत्रण

सायबर पोलीस ठाण्यात २०२५ मध्ये ३४ सायबर गुन्हे दाखल झाले. त्यापैकी १९ गुन्ह्यांची निर्गती झाली असून १५ तपासाधीन आहेत. या प्रकरणांत १.०४ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.एनसीसीआरपी पोर्टलवरील ६०९ तक्रारींपैकी ४७९ तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे.सायबर जनजागृतीसाठी जिल्ह्यात ४७ कार्यक्रम, तर आयटी कायदा अंतर्गत ८४ सोशल मीडिया पोस्टवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.धाराशिव जिल्ह्यातील शेअर मार्केट फसवणूक प्रकरणात बीड सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास करून ७.५१ लाख रुपये तक्रारदाराला परत मिळवून दिले, ही उल्लेखनीय कामगिरी ठरली.

### ● तांत्रिक सुधारणा व प्रशासकीय यश

ई–साक्ष प्रणालीचा वापर ९९% पयरत वाढविण्यात यश, सीसीटीएनएस रँकिंगमध्ये राज्यात सलग पहिल्या पाचमध्ये स्थान, ई–तक्रार पोर्टलवरील ९९.५% तक्रारींची निर्गती, गणेशोत्सवासाठी १७१६ मंडळांना ऑनलाईन परवाने, झिरोएफआयआर प्रकरणांत १००% वेळेत नोंद

### ● पोलीस कल्याण व सामाजिक उपक्रम

५० हजार वृक्ष लागवड, आरोग्य शिबिरे, योगदिन, नशामुक्ती बाईक रॅली, पूरग्रस्तांसाठी आर्थिक मदत, नवीन वाहने व पोलीस कॅन्टीन सुरू करून पोलीस दलाच्या कल्याणावर भर देण्यात आला आहे.

### ● वॉर रूम व कोम्बिंग ऑपरेशन

जुलै ते डिसेंबर २०२५ दरम्यान वॉर रूमच्या माध्यमातून६० मालमत्ताविषयक गुन्हे उघडकीस आले. आंतरजिल्हा कोम्बिंगऑपरेशनमुळे सराईत गुन्हेगार, फरार आरोपी व रिसिव्हर नेटवर्कवरप्रभावी कारवाई झाली आहे.

### ● सायबर डेस्क व मोबाइल रिकव्हरी

जिल्ह्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर डेस्क स्थापन करण्यात आली असून आतापयरत ७३० हरवलेले/चोरीस गेलेले मोबाइल हस्तगत करण्यात यश आले आहे.

### ● गंभीर गुन्ह्यांचा जलद उलगडा

बर्दापूर पोलीस ठाणे हद्दीतील अज्ञात खून प्रकरणाचा ४८ तासांत उलगडा, तसेच घरफोडीच्या सुमारे १०० गुन्ह्यांमध्ये वांछित असलेल्या सराईत आरोपीस अटक करण्यात पोलीस यशस्वी ठरले.

### ● महिला, बाल संरक्षणे व मानवी वाहतूक प्रतिबंध

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने ११ गुन्ह्यांत २६ पीडितांची सुटका, बालकामगार प्रकरणांत १२ बालकांची मु ता, तसेच ३ बालविवाह रोखले आहेत. दामिनी पथकाने ५९९ ठिकाणी भेटी देत महिलांच्या सुरक्षिततेसाठी जनजागृती केली.

### ● स्थानिक गुन्हे शाखेची व्यापक कामगिरी

खून, दरोडा, जबरी चोरी, चैन स्नॅचिंग, घरफोडी, वाहन चोरी, फसवणूक, वाळू चोरी,एनडीपीएस, गुटखा व दारूबंदी आदी प्रकरणांत शेकडो आरोपींना अटक करून कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## आ. नमिता मुंदडा यांच्या मागणीला यश

**सोयाबीन, मूग आणि उडीद नोंदणीला ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले असून, राज्यातील सोयाबीन, मूग आणि उडीद उत्पादक शेतकऱ्यांसाठी हमीभावाने खरेदी करण्यासाठीची ऑनलाईन नोंदणीची मुदत आता ३१ जानेवारी २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणार होती, मात्र शेतकऱ्यांच्या अडचणी आणि तांत्रिक कारणांचा विचार करून शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

राज्यात यंदा सोयाबीनचे उत्पादन समाधानकारक झाले असले तरी खुल्या बाजारपेठेत मिळणारे भाव हमीभावापेक्षा खूपच कमी आहेत. यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून त्यांना नाफेडच्या खरेदी केंद्रांचा मोठा आधार आहे. मात्र, अनेक ठिकाणी नवीन खरेदी केंद्रांना उशिरा मिळालेली मंजुरी, मनुष्यबळाचा अभाव आणि तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी प्रक्रियेला विलंब झाला होता. परिणामी, अनेक शेतकरी या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती. हीच गंभीर बाब आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे कळवली होती. त्यांनी पत्रात नमूद केले होते की, जर नोंदणीची मुदत वाढवून दिली नाही, ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रत्येक जिनिंगवर शेतकऱ्यांच्या कापूस ऑनलाईन प्रक्रियेची व्यवस्था करा: राजेंद्र आमटे

**बीड येथे जिल्ह्याच्या ठिकाणी पूर्णवेळ जिनिंग सुरू ठेवा**

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हा हा कापूस व सोयाबीन पिकासाठी ओळखला जातो. मात्र सीसीआयकडे कापूस विक्रीसाठी आवश्यक असलेली ऑनलाईन प्रक्रिया शेतकऱ्यांना स्वतः करता येत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रत्येक जिनिंगवर शेतकऱ्यांच्या वतीने ऑनलाईन नोंदणी, सातबारा अपलोड, बाजार समितीची संमती व स्लॉट बुकिंग ही संपूर्ण प्रक्रिया जिनिंगमार्फतच करून देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी केली आहे.

तसेच बीड जिल्ह्याच्या ठिकाणी चार्जिंगला मान्यता असतानाही एकही जिनिंग पूर्णवेळ सुरू नाही, ही गंभीर बाब आहे. यामुळे शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी माजलगाव, केज, धारूर अशा दूरच्या ठिकाणी जावे लागत असून वेळ, खर्च व त्रास वाढत आहे. माजलगाव मध्ये आठ जिंनिग पूर्ण वेळ सुरु आहेत मग बीड जिल्ह्याच्या ठिकाणी एक हि जिंनिग ▶▶ उर्वरित पान २ वर

## शांताई अर्बन दिनदर्शिका प्रकाशन सोहळा अनेक दीगजाच्या उपस्थितीत साजरा

**बीड । प्रतिनिधी**



दरवषी प्रमाणे या ही वर्षी शांताई अर्बन दिनदर्शिका प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता प्रकाशनासाठी सर्व खातेदार संचालक पिग्मी एजंट सभासद उपस्थित होते. सामान्य माणसापर्यंत दिनदर्शिका पोहचवण्याचां मानस आहे असे मत शांताई अर्बन चे अध्यक्ष डॉ.डी बी शिंदे सर यांनी मांडले तसेच छोट्या उदयोग धंद्यांना शांताई अर्बन मुळे मदत होते असे मत सांगताय. शांताई अर्बनच्या दिनदर्शिका प्रकाशनाला आवर्जून उपस्थित मान्यवर आरोग्य क्षेत्रातील नामवंत डॉ. शेंडगे सर सपत्नीसह, डॉ. मितेश गवते डॉ. एकनाथ पवार सर डॉ. मनोज मुंडे सर डॉ.देशपांडे सर तसेच नवनिश्चित नगरपरिषद सदस्य संजय भाऊ उडान ,नंदू पिंगळे ,युवा उद्योजक अमित शिराळे ,प्रवीण सुरवसे,बाळू घोडके,रोहित जाधव,राज शिराळे, गणेश चव्हाण,बाबू मुने,जयंत वाघ, प्रवीण मुळूक, मुन्ना नाईक, नितीन काळे सर, अतुल डाके इत्यादी अनेक मान्यवर व खातेदारांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे उपाध्यक्ष संदीप वाघमारे संचालक मंडळ परमेश्वर शिंदे साईनाथ वाघमारे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संस्थेच्या प्रगतीचा आलेख, सामाजिक उपक्रम, तसेच सभासद व ग्राहकांसाठी उपयुक्त माहिती या दिनदर्शिकेत समाविष्ट करण्यात आली आहे. ग्राहकांचा विश्वास हेच संस्थेचे भांडवल असून पारदर्शक व विश्वासार्ह सेवा देण्याची परंपरा कायम ठेवली जाईल, असे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. दिनदर्शिकेच्या प्रकाशनानंतर उपस्थितांनी शताई अर्बन को–ऑप. क्रेडिट सोसायटीच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## बीडचे विद्रुपीकरण थांबवा! अपघातांना आमंत्रण देणारी बॅनरबाजी बंद करा; 'होर्डिंग्जमुक्तीचा नाशिक पॅटर्न' तातडीने राबवा : डॉ. गणेश ढवळे

● कायद्याला हरताळ, न्यायालयाचा अवमान! बॅनरबाजीचा कहर; नप कार्यालयासमोर निदर्शने
● नवनिर्वाचितांची सत्तेची धुंदी; शहर बॅनरच्या विळख्यात! 'नाशिक पॅटर्न'ची अंमलबजावणीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील प्रमुख बाजारपेठा, मुख्य रस्ते व चौकांमध्ये विजेच्या खांबांवर, सिग्नलवर तसेच रस्त्याच्या दुभाजकांवर मोठ्या प्रमाणात लावण्यात आलेल्या अनधिकृत बॅनरमुळे शहराचे विद्रुपीकरण झाले असून वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी बॅनर रस्त्यावर झुकल्याने वाहनचालकांसाठी अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

शहर स्वच्छता, सौंदर्यीकरण व नागरिकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या नगरपरिषदेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत कोणतीही ठोस कारवाई न केल्याने अनधिकृत बॅनरबाजीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर 'होर्डिंग्जमुक्तीचा नाशिक पॅटर्न' बीडमध्ये तातडीने राबवावा, अशी मागणी करत सामाजिक कार्यकर्ते व बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली आज नगरपरिषद कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. निदर्शकांनी बॅनरबाजी थांबवा अशा घोषणा देत नगरपरिषदेच्या भूमिकेचा निषेध केला. यावेळी शैलेश फडसे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन सादर करण्यात आले. या आंदोलनात माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक,रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष – इंटक, बीड), आर .आर.जाधव, डी.जी.तांदळे( महाराष्ट्र राज्य किसान सभा बीड जिल्हाध्यक्ष), नितीन जायभाये (अध्यक्ष बीड शहर बचाव मंच), अँड. ▶▶ उर्वरित पान २ वर

## रहेमान सय्यद यांना गंगाई–बाबाजी राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कार जाहीर



**कडा । प्रतिनिधी**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भगवान महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित गंगाई–बाबाजी कला रौप्य महोत्सव अंतर्गत यंदाचा राज्यस्तरीय गंगाई–बाबाजी आर्दश समाजसेवक पुरस्कार कडा येथील सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यदअली सय्यद यांना जाहीर झाला आहे. आष्टीचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## कृषीथॉन २०२५, तर्फे हनी दर्डा यांना महिला कृषी उद्योजक पुरस्कार' प्रदान




**बीड । प्रतिनिधी**

नाशिकमध्ये ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन आणि मीडिया एक्झिबिटर्स प्रा.लि यांच्या संयुक्त विद्यमाने 'कृषीथॉन' या आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात 'प्रयोगशील महिला कृषी उद्योजक' म्हणून हनी दर्डा यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हनी दर्डा यांच्या दूरदृष्टीमुळे, मेहनतीमुळे आणि नेतृत्वगुणांमुळे आज संपूर्ण देशांत नव्हे नव्हे तर संपूर्ण जगात शेती क्षेत्रात 'एक्झोम लाईफ सायन्सेस' हे नाव ▶▶ उर्वरित पान २ वर

## मोरगावला बांधावर उतरल प्रशासन : बैठक व आढावा

**तहसीलदार शेळके यांनी गावातील अतिक्रमणासोबतच शेतातील रस्त्याची केली पाहणी**

**बीड । प्रतिनिधी**





मांजरसुंबा महसूल मंडळातील मौजे मोरगाव येथे सोमवार दिनांक २९ रोजी प्रशासन प्रत्यक्ष गावात उतरल्याचा अनुभव नागरिकांना मिळाला . हा अनुभव केवळ बैठकीपुरता मर्यादित न राहता , थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन समस्या पाहण्याचा आणि त्या सोडवण्याचा ठरला . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मोरगाव येथे गावातील अतिक्रमण , शेतातील रस्ते , तसेच नागरिकांनी मांडलेल्या विविध तक्रारींची जागेवर पाहणी करत प्रशासनाची लोकाभिमुख भूमिका स्पष्ट केली .

ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेली मंडळ स्तरीय आढावा बैठक ही नेहमीच्या सरकारी औपचारिकतेपेक्षा वेगळी ठरली . शेतकरी , महिला , वृद्ध , तरुण , लोकप्रतिनिधी आणि अधिकारी एकाच छताखाली बसून थेट संवाद साधताना दिसले . कुणाच्या हातात अर्ज होते , कुणाच्या डोळ्यात प्रश्न होते , तर कुणाच्या मनात केवळ अपेक्षा होती की आज तरी आपली अडचण ऐकली जाईल .

प्रशासन गावाकडे ही संकल्पना मोरगावमध्ये कागदावर नव्हे , तर प्रत्यक्ष कृतीत उतरलेली दिसली . राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार प्रशासन लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे , समस्या कार्यालयात नव्हे तर जागेवर सुटल्या पाहिजेत , हा संदेश शासनाने ठामपणे दिला आहे . त्याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल यंत्रणा गावपातळीवर सक्रिय झाली आहे . बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सातत्याने दिलेला सेवा ही कागदात नाही , तर माणसाच्या आयुष्यात ▶▶ उर्वरित पान २ वर